# नगरपालिका शाखा–Website Data

नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयातील नगरपालिका शाखेतील अधिकारी व कर्मचारी याची कार्ये व कर्तव्य याचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | शाखेचे नाव | नगरपालिका शाखा |
| २ | पत्ता | विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक रोड |
| ३ | कार्यालय प्रमुख | सह आयुक्त |
| ४ | शासकिय विभागाचेनांव | नगर विकास विभाग |
| ५ | कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त | १. नगर विकास विभाग<br>२. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई |
| ६ | कार्यक्षेत्र | विभागीय कार्यक्षेत्र (नाशिक, अहमदनगर, जळगाव,धुळे व नंदुरबार या पाच जिल्ह्यांचे नागरी कार्यक्षेत्र) |
| ७ | विशिष्ट कार्ये | नगरपालिका प्रशासनाशी संबंधीत विभागातील ६१ नगरपालिकाचे संनियंत्रण, आढावा इ. |
| ८ | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | ०२५३-२४६२४०१ |

| स्थानिक स्वराज्यसंस्था माहिती जिल्हा निहाय | | |
|---|---|---|
| अहिल्यानगर जिल्हा | | |
| अ.क्र | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | ई मेल आयडी |
| 1 | अकोले | coakole1@gmail.com |
| 2 | देवळाली प्रवरा | deolalipravaraco@gmail.com |
| 3 | जामखेड | cojamkhed1@gmail.com |
| 4 | कर्जत | cokarjat55@gmail.com |
| 5 | कोपरगाव | cokopargaon@gmail.com |
| 6 | नेवासा | co.newasa@gmail.com |
| 7 | पारनेर | coparner@gmail.com |
| 8 | पाथर्डी | copathardi@gmail.com |
| 9 | राहाता | Corahata@gmail.com |
| 10 | राहुरी | corahuri@gmail.com |
| 11 | संगमनेर | cosangamner@gmail.com |
| 12 | शेवगाव | coshevgaon@gmail.com |
| 13 | शिर्डी | coshirdi@gmail.com |
| 14 | श्रीगोंदा | coshrigonda@gmail.com |
| 15 | श्रीरामपूर | coshrirampur@gmail.com |

| जळगाव जिल्हा | | |
|---|---|---|
| अ.क्र | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | ई मेल आयडी |
| 1 | अमळनेर | coud.amalner@gmail.com |
| 2 | भडगाव | npbhadgaon@gmail.com |
| 3 | भुसावळ | bmcbsl1882@gmail.com |
| 4 | बोदवड | bodwadnagar123@gmail.com |
| 5 | चाळीसगाव | chalisgaonnp@gmail.com |
| 6 | चोपडा | co.mcchopda@gmail.com |
| 7 | धरणगाव | dharangoanmc@gmail.com |
| 8 | एरंडोल | mcerandol@gmail.com |
| 9 | फैझपूर | faizpurnp@gmail.com |
| 10 | जामनेर | cojamner@gmail.com |
| 11 | मुक्ताईनगर | comuktainagar@gmail.com |
| 12 | नशिराबाद | nagarparishadnashirabad@gmail.com |
| 13 | पाचोरा | copachora@gmail.com |
| 14 | पारोळा | pmcparolajal@gmail.com |
| 15 | रावेर | ravernp@gmail.com |
| 16 | सावदा | cosavda3@gmail.com |
| 17 | शेंदुर्णी | npshendurni@gmail.com |
| 18 | वरणगाव | covarangaon@gmail.com |
| 19 | यावल | coyawal@gmail.com |

| नाशिक जिल्हा | | |
|---|---|---|
| अ.क्र | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | ई मेल आयडी |
| 1 | भगूर | cobhagur@gmail..com |
| 2 | चांदवड | cnpc253820@gmail.com |
| 3 | देवळा | mcdeola1@gmail.com |
| 4 | दिंडोरी | dindorinagarpanchayat@gmail.com |
| 5 | इगतपुरी | igatpurimun@gmail.com |
| 6 | कळवण | mckalwan@gmail.com |
| 7 | मनमाड | co.manmad@gmail.com |
| 8 | नांदगाव | nandgaon.municipal@gmail.com |
| 9 | निफाड | npniphad@gmail.com |
| 10 | ओझर | ozarnagarparishad@gmail.com |
| 11 | पेठ | nppeth@gmail.com |
| 12 | सटाणा | nodalofficersatana@gmail.com |

| | | |
|---|---|---|
| 13 | सिन्नर | cosinnar@gmail.com |
| 14 | सुरगाणा | surgananp@gmail.com |
| 15 | त्रिंबक | cotmc.tbl@gmail.com |
| 16 | येवला | coyeola@gmail.com |
| 17 | पिंपळगाव बसवंत | panchayatpb@gmail.com |

| धुळे जिल्हा | | |
|---|---|---|
| अ.क्र | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | ई मेल आयडी |
| 1 | दोंडाईचा वरवाडे | codondaicha@gmail.com |
| 2 | साक्री | cosakrinp@gmail.com |
| 3 | शिरपूर वरवाडे | shirpurnagarparishad@gmail.com |
| 4 | शिंदखेडा | coshindkhedanp@gmail.com |
| 5 | पिंपळनेर | co.np.pimpalner@gmail.com |

| नंदुरबार जिल्हा | | |
|---|---|---|
| अ.क्र | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | ई मेल आयडी |
| 1 | धडगाव | npakrani@gmail.com |
| 2 | नंदुरबार | conandurbarnmc@gmail.com |
| 3 | नवापूर | conp.nvpr@gmail.com |
| 4 | शहादा | co.shahada@gmail.com |
| 5 | तळोदे | conp.tldr@gmail.com |

नगरपालिका शाखेतील कामाची धोरणे / कामाचे संक्षीप्त स्वरुप व उपलब्ध सेवा

१. नगरपालिका कायदयाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे- महाराष्ट्र नगरपालिका व नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६७ चे कलम ४(१)अन्वये महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन म्हणुन विभागीय आयुक्त यांना अधिसुचनेद्वारे घोषित केले आहे.

२. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नगरपालिका शाखेत प्रादेशिक तथा विभागीय आयुक्त यांचे अधिनस्त खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

| पदनाम | सख्या | पदनाम | सख्या |
|---|---|---|---|
| सहआयुक्त | १ | उप अभियंता (यांत्रिकी) | १ |
| उपायुक्त | १ | स्थापत्य अभियंता श्रेणी-अ | १ |
| सहायक आयुक्त (गट-अ) | १ | सहायक आयुक्त (लेखा) | १ |
| सहायक आयुक्त(गट-ब) | २ | लेखापाल लेखापरीक्षक | १ |
| सहायक विधी अधिकारी | १ | अधिक्षक -गट-ब (अराजपत्रित ) | २ |
| अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | १ | सहाय्यक | ३ |
| उप अभियंता (स्थापत्य) | १ | शिपाई (करार तत्वावर) | २ |
| एकूण मंजूर -१९- स्थायी पद १७ व करार तत्वावर-२ | | | |

३. नगरपालिका प्रशासनाची संबंधित नगरपरिषदांचे सार्वत्रिक निवडणुक बाबत राज्य निवडणुक आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचने नुसार कामे केली जातात. महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषद औदयोगिक नगरी अधिनियम १९६७ मधील ४४(४)४५(५), ५६(४)अन्वये प्राप्त होणाऱ्या अपीलांवर कार्यवाही करणे.

४. महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषद औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ मधील सुचने नुसार कलम ३०८(४) अन्वये दाखल होणारे अर्ज तसेच रिव्हीजन ॲप्लीकेशन कलम ३२० बाबत कार्यवाही करणे.

५. संचालक नगरपालिका प्रशासन यांचेकडील आदेशानुसार विभागातील २४ नगरपालिका/ नगरपरिषदांची वार्षिक तपासणी करणे नगरपरिषदेच्या कामावर पर्यवेक्षण/ नियंत्रण ठेवणे

६. महानगरपालिका नगरसेवक अपात्रतेते बाबत अपील चालवणे

७. महानगरपालिकेच्या महापौर/ उपमहापौर/ स्थायी समिती व इतर समित्यांच्या सभापती पदाची निवडी बाबतची तारीख व वेळ ठरविणे

८. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका/ पोट निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी व इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे तसेच महानगरपालिकेतील निवडुक आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांची नोंदणी करणेइ.

९. नगरपरिषदा/ महानगरपालिका यांचे कामाकाजाचे संबंधित दाखल होणाऱ्या तक्रारी अर्जा बाबत योग्यती कार्यवाही करणे

१०. राज्य निवडणुक आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार नगरपरिषदा निवडणुक संबंधित सदस्य संख्यानिश्चित करुन राज पत्रात प्रसिध्द करणे तसेच आयोगा कडील निवडणुक कार्यक्रमानुसार प्रभाग वार्ड रचना निश्चित करणे.

११. माहितीच्या अधिकार अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करणे

अधिकारी व कर्मचारी यांची कार्य व कर्तव्ये याबाबत तपशिल

| अ.क्र. | पदनाम | कोणत्या कायद्या/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रकानुसार (प्रशासकिय आर्थिक व अर्ध-न्यायिक अधिकार व कर्तव्ये) |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | • महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३०८(३) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशावर कलम ३०८(४) अन्वये कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहे.<br>• महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम१९८६ व नियम १९८७ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या नगरसेवकांना अपात्र ठरविणे बाबत सुनावणी घेवून निर्णय घेणे.<br>• विभागातील नगरपरिषदाचे मुख्याधिकारी यांची वेतन निश्चिती करणे, १२०दिवसांपर्यंत रजा मंजूर करणे.<br>• संचालकासोबतच प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन हे देखील वापर करण्यास सक्षम असलेले अधिकार खालीलप्रमाणे-<br>• कलम १६(३) (इ) नगर परिषद सदस्यांना पालिकेला साहीत्य पुरवठा करण्यास मान्यता देणे.<br>• कलम ४५(५) कलम ४५ खालील नगरपरिषद सदस्यास अपात्र ठरविण्याच्या जिल्हाधिका-याच्या आदेशा विरुध्द अपील.<br>• कलम४९(२) (एस) कंपोस्ट खत तयार करण्यास नगर परिषदाना भागपाडणे. |

| | | |
|---|---|---|
| | सह आयुक्त/ उप आयुक्त/ सहायक आयुक्त (गट-अ)/ | • कलम४९(७) शैक्षणिक किंवा इतर धर्मार्थ संस्थाना अनुदान मंजूर करण्यास मंजूरी देणे.<br>• कलम५६(४) सततचे गैरहजेरी बद्दल अध्यक्ष/उपाध्यक्षाना अपात्र ठरविणा-या जिल्हाधिका-याच्या आदेशा विरुध्द अपील.<br>• कलम६२ नगर परिषदाना वाहन व्यवहार समिती नियुक्तीला मान्यता देणे.<br>• कलम८८ (२) शासना कडून नगर परिषदेस मिळालेल्या जमीनी शर्तभंगामुळे परत ताब्यात घेणे.<br>• कलम९६ नगरसेवका विरुध्द दावा दाखल करण्यास मंजूरी देणे.<br>• कलम९७ (ब)(३) परंतुक नगर परिषदेच्या महसूलाच्या २% पेक्षा जास्त परंतु ५% पर्यत रकमेचे अनुदान संस्थाना मंजूरी.<br>• कलम९८(१) नगर परिषदे कडील अतिरिक्त निधी सहकारी बॅकेमध्ये गुंतविण्यास मंजूरी देणे.<br>• कलम३०७ नगर परिषदे कडून किंवा तिच्यावतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा केली जात असेल ती करण्यास त्यांच्या मते असलेला कोणताही आक्षेप किंवा तो पुरवू शकेल अशा कोणत्याही माहिती मुळे अशा नगरपरिषदेने एखादी गोष्ट करणे त्यांच्या मते आवश्यक असेल अशी माहिती विचारात घेणे विषयी नगरपरिषदेस फर्मविणे इ.<br>• कलम३१० (ब) नगर परिषदानी केलेल्या उधळपट्टी विरुध्द जिल्हाधिका-यानी दिलेल्या आदेशा विरुध्द अपील.<br>• कलम३११नगरपरिषदेच्या कारभारा विषयी चौकशी आदेशीत करणे.<br>• कलम३१८ नगर परिषदेच्या आदेशाचे पुर्नरीक्षण किंवा फेरतपासणी (अधिनियमातील कलम ३०८(४) मधील प्रकरणा मध्ये आयुक्त व प्रादेशिक संचालकानी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेली अपीले काढणे).<br>• कलम३२२ (३)(फ) नगर परिषदेच्या उपविधीना मान्यता देणे संचालक नगरपालिका प्रशासन मुंबई यांचे कडील आदेश दि.१/१/०१ अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार संचालकाना असलेले मूळ अधिकार प्रादेशिक संचालकांना प्रदान केलेले आहेत ते खालील प्रमाणे-<br>• कलम ९(२) आरक्षणासह नगर परिषदेच्या सदस्यांची संख्या निश्चित करणे व नगर परिषदा मधील आरक्षण (अजा/ अज/ इमाव/ स्त्रिया).<br>• कलम ७१ अन्वये विषय समितीच्या विषय वाटपाच्या उपविधींना मान्यता देणे.<br>• कलम ७१(अ) स्थायी समिती वा विषय समितीचे अधिकार व कर्तव्ये आमसभा किंवा विशेष समितीव्दारे पार पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे.<br>• कलम ७९(६) कर्मचा-याना नगर परिषदेने दिलेल्या शिक्षे विरुध्दचे अपीलाची सुनावणी व निर्णय घेणे.<br>• कलम ९७ (अ) आणि नगर परिषदेच्या हद्द बाहेर निधी खर्च करण्यास मान्यता देणे.<br>• कलम ३०१ (एफ)(२) नुसार कलम १७३(पोटकलम ३ अन्वये विक्री करण्यात आलेल्या किंवा भाडेपटटयाने दिलेल्या स्थावर मालमत्ते संबंधीच्या दाव्याच्या समेटास मान्यता देणे.<br>• कलम ३०८(४) जिल्हाधिका-याचे आदेश बदलणे, रद करणे इ.<br>• कलम ३२३(३) (४) उपविधी स्विकारण्यास भाग पाडणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • कलम ३४१ क्यु (३) औद्योगिक नगराचा ठराव रद करणे संबंधीचा जिल्हाधिकारीचा आदेश रद करुन निरसीत करणे.<br>• स्थानिक निधी लेखा परिक्षा नियम. |
| २ | सहायक आयुक्त (लेखा)/लेखा परिक्षक | लेखा विषयक सर्व बाबी. भार/अधिभार प्रकरणे, लेखापरिक्षण, अंदाजपत्रक, सेवा विषयक आर्थिक प्रकरणे,उपयोगिता प्रमाणपत्रे, ७ योजना माहिती व कार्यवाही व इत्यादी. |
| ३ | सहायक आयुक्त (गट-ब) | • विभागातील ५ जिल्हयांमध्ये असलेल्या ६६ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कामकाजावर संनियत्रण ठेवणे .<br>• स्थानिक स्वराज्य संस्थाचे मुख्याधिकारी यांचे १२०दिवसापर्यतची अर्जीत/परावर्तीत रजा मंजूर करणे.<br>सहायक/ अधिक्षक यांचेमार्फत सादर करण्यात आलेली संचिका तपासून व त्यावर अभिप्राय देवून विभागीय आयुक्ताकडे सादर करणे.<br>• विभागातील एकूण १२नगरपरिषदाची प्रत्येक वित्तीय वर्षात प्रशासकीय तपासणी करणे.<br>प्रशासकीय तपासणी केलेल्या तपासणी शकाबाबत अनुपालन अहवालावर स्विकृती देणे.<br>त्यांची सेवा पुस्तके अद्यावत करणे.<br>• विभागातील सर्वात कमी प्रतवारी असलेल्या नगरपालिकाना भेट देवून मार्गदर्शन करणे.<br>• माहितीचे अधिकार कायद्याखाली प्रथमअपीलीय अधिकारीम्हणून काम करणे |
| ३ | अधिक्षक | सह आयुक्त/उपायुक्त/सहायक आयुक्त याचे नियंत्रणाखाली पर्यवेक्षीय कामकाज करणे. सहायक यांचे मार्फत सादर करण्यात आलेली फाईल तपासून सादर करणे. माहितीचे अधिकार कायद्याखाली जन माहिती अधिकारी म्हणून काम करणे. |
| ४ | सहायक/ अव्वल कारकून | • माहितीचे अधिकार कायद्या खाली "सहायक जन शासकीय माहिती अधिकारी" म्हणून काम करणे.<br>नगरपालिका शाखेतील सर्व प्रकारचे कामकाज हाताळणे.<br>• नगरपालिका शाखेतील टंकलेखना संबंधी सर्वकामे तसेच संगणका वरील आवश्यक कामे. पाक्षिक बैठकी साठी गोषवारा तयार करणे. |

नगरपालिका शाखेच्या कामाशी संबंधीत नियम/ अधिनियम

| अ.क्र. | अधिनियम व नियम |
|---|---|
| १ | महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ |
| २ | महाराष्ट्र लोकल ॲथॉरिटी मेंबर्स डिस्क्वालिफिकोन ॲक्ट १९८६ व नियम १९८७ |
| ३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ |
| ४ | महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ |
| ५ | मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० |
| ६ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ |

| | |
|---|---|
| ७ | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ |
| ८ | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील नियम) १९७१ |
| ९ | माहिती अधिकार अधिनियम २००५ |
| १० | विभागातील २४ नगरपरिषद प्रशासकीय तपासणी करण्याचे अधिकार |

नगरपालिका कामाशी संबंधीत कामाशी महत्वाचे संबंधीत शासन निर्णय/ आदेश व परिपत्रके

| अ.क्र | शासन निर्णय तारीख | शासन निर्णयानुसार दिलेले विषय |
|---|---|---|
| १ | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपसू २००१/प्रक्र १/२००१/५ दि.१/१/२००१ | नगर परिषद अधिनियमातील अधिकाराचे विकेंद्रीकरण |
| २ | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नप्रसई १०२०/प्रक्र १३६/७ दि.२०/४/०१ | रोजंदारी वरील कर्मचा-यांना नगर पालिका सेवेत नियमीत करण्या करिता अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यांना प्रदान करण्या बाबत |
| ३ | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपप्रस १ ते ६/१ ते ३४ न.प.सर्व अनियमीत धोरण २००५/प्रक्र ३८९ २६ दि.१६/५/०५ | नगरपरिषदांनी विहीत पध्दतीचा अवलंब न करता मंजूर व रिक्त पदा वर केलेल्या अनियमीत नेमणूका नियमीत करणे बाबतचे अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यांना प्रदान करण्या बाबत |
| ४ | संचालक, न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपप्रस ४/२०/९४९/१ वय शिथील २००४/प्रक्र ३९३(५)/२६ दि.१३/१/०६ | नगरपरिषद आस्थापने वरील कर्मचा-याचे नेमणूकीच्या वेळी अधिक असलेले वय क्षमापना बाबतचे अधिकार प्रादेशिक संचालक न.पा.प्र. यंना प्रदान करण्या बाबत |
| ५ | महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.टंचाई २०९९/प्रक्र १४/पापु १४ दि.२/२/९९ | उन्हाळयात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी क्षेत्रात तातडीच्या पाणी पुरवठा योजना |
| ६ | आयुक्त राज्य निवडणूक आयोग आदेश क्र.रानिआ/मनपा २००५/प्रक्र १७/२/५ दि.३ मे ०५ | नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागा मध्ये विभागणी करणे बाबत सुधारीत आदेश |
| ७ | संचालक, न.पा.प्र.मुंबई स्था.नि.क्र.नपसई.नगर परिषद नियंत्रण २००५/प्रक्र/३७३/३२ दि.११/५/०५ | नगरपरिषदाचे कामकाज नियंत्रणा साठी २० कलमी कार्यक्रम विहीत करणे बाबत |
| ८ | संचालक, न.पा.प्र.मुंबई स्था.नि.क्र.नपसई.नगर परिषद नियंत्रण २००५/प्रक्र/४१४/३२ दि.८ /६/०५ | नगरपरिषदाची प्रतवारी ठरविण्याबाबत |
| ९ | आयुक्त तथा संचालक न.पा.प्र.मुंबई आदेश क्र.नपाप्रस २००५/माअ १७०८/३ दि.१६/५/०६ | केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपीलीय प्राधिकारी /शासकीय माहिती अधिकारी/सहा. माहिती अधिकारी नियुक्त करणे बाबत |
| १० | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या कडील शासन निर्णय क्र.नास्वअ २००६/प्रक्र ६१/पापु २१ दि.१२/२/०७ व २६.१०.२००७ | संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अंमलबजावणीबाबत. |

| | | |
|---|---|---|
| ११ | प्रधान सचिव,नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई याचेकडील क्र.डीएम एन /५००६/ २७०/प्र.क्र.६५/२००६/नवि ३२, दि.१२.१०.०६ तसेच शासन राजपत्र दि१२/१०/०६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अधिनियम (महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणुक घेणे) नियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येवुन महापौरांची अथवा उपमहापौरांची निवड करण्यासाठी बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. |
| १२ | शासन राजपत्र दि.२७.२.२००७ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामध्ये सुधारणा करण्यात येवुन प्रकरण ३ मध्ये ३१अ समाविष्ट करण्यात आलेला आहे त्यामुळे महापालिकांमध्ये मान्यता प्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ महापालिकेच्या विविध समितींवर सदस्यांचे नामनिर्देशन करतांना विचारात घेण्यात येईल. |
| १३ | उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. बीएमएन /५००६/३९२ /प्र.क्र.९३/ नवि ३२,दि.२/३/२००७ | सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ पक्षाची आघाडी अथवा गट याची नोंदणी करण्याबाबतचे प्राधिकारी |
| १४ | कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.बीएनएम/२००८/ २९५/प्र.क्र.१०६/२००८/नवि ३२, दि.१२.१२.०८ | महानगरपालिकांमधील स्थायी समिती आणि इतर समित्यांच्या सभापतीपदाची निवडणुक घेण्यासाठी पीठासीन अधिका-याची तरतुद करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती ,परिवहन समिती,प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक)(सुधारणा)नियम २००८ |

नगरपालिका शाखेतील अधिकारी/ कर्मचारी यांची नावे व मासिक वेतन भत्ते याबाबतचा तपशील

विभागीय आयुक्त कार्यालय, नशिक

नगरविकास शासन निर्णय दिनांक ०५.०८.२०२० मंजुर आकृतीबंध पद

| क्र. | सवर्ग | पदनाम | मंजुर पद | कार्यरत पद | अधिकारी यांचे नाव | रिक्त पद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा | सह आयुक्त S-25 (₹78,800–₹2,09,200) | १ | १ | श्री.नितीन पवार | ० |
| २ | महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा | उपायुक्त S-23 (₹67,700–₹2,08,700) | १ | ० | श्री.श्रीनिवास कुरे | १ |
| ३ | महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा | सहा.आयुक्त गट-अ S-20 (₹56,100–₹1,77,500) | १ | १ | दिनांक ०६.११.२०२५ पासून रिक्त | ० |
| ४ | महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा | Ãसहा.आयुक्त गट–ब S-15 | २ | २ | श्री.स्वप्निल मुधलवाडकर | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (₹41,800–₹1,32,300) | | | श्री.अमोल चौधरी | |
| ५ | विधी अधिकारी | सहा.विधी अधिकारी S-15 (₹41,800–₹1,32,300) | १ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | १ |
| ६ | अधिक्षक | अधिक्षक गट–ब (अराजपत्रित) S-14 (₹38,600–₹1,22,800) | २ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | २ |
| ७ | सहाय्यक | सहाय्यक S-8 (₹25,500–₹81,100) | ३ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | ३ |
| ८ | अभियंता स्थापत्य | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) S-25 (₹78,800–₹2,09,200) | १ | ० | रिक्त (माहे फेब्रुवरी २५पासून) | १ |
| ९ | अभियंता स्थापत्य | उपअभियंता (स्थापत्य) S-20 (₹56,100–₹1,77,500) | १ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | १ |
| १० | उपअभियंता (यांत्रिकी) | उपअभियंता (यांत्रिकी) S-20 (₹56,100–₹1,77,500) | १ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | १ |
| ११ | अभियंता स्थापत्य | अभियंता (स्थापत्य) श्रेणी–अ S-14 (₹38,600–₹1,22,800) | १ | ० | रिक्त ( मंजुर आकृती बंध निर्मिती पासून ) | १ |
| १२ | लेखा | सहा.आयुक्त (लेखा) S-20 (₹56,100–₹1,77,500) | १ | १ | श्रीमती वनिता देवरे | ० |
| १३ | लेखा | लेखापल S-15 (₹41,800–₹1,32,300) | १ | १ | श्री.धिरज सारडा | ० |
| एकूण बेरीज | | | १७ | ६ | | ११ |

| | |
|---|---|
| मंजुर पद | १७ |
| कार्यरत पद | ६ |
| रिक्त पद | ११ |

DMA कडील परिपत्रक दिनांक १३.०८.२०२१ नुसार निरसीत होणारी पद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार | निरंक | |
| २ | रजा राखीव मुख्याधिकारी | २ | |
| ३ | मुख्याधिकारी गट-ब | १ | |
| ४ | महानिरिक्षक गट-ब | निरंक | |
| ५ | नियोजनसहाय्यक गट-ब | १ | |
| ६ | अव्वल कारकून | ४ | माहे फेब्रु.२६पर्यंतमुदतवाढ |
| ७ | निरिक्षक | २ | १ पदास माहे फेब्रु.२६पर्यंतमुदतवाढ |
| ८ | लिपिक टंकलेखक | २ | |
| ९ | नगररचनाकार | १ | |
| १० | लेखाधिकारी/मुख्य लेखापाल/ उपलेखापाल गट-ब | १ | |
| ११ | सहाय्यक लेखाधिकरी | १ | |
| | एकूण | १५ | |

नगरपरिषदा संबंधित विविध योजना या बाबत माहिती

१. प्रधानमंत्री आवास योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी पीएम आवास योजना (PMAY २.० Scheme) सुरू केली आहे. या योजनेतंर्गत पुढील पाच वर्षांत एक कोटी कुटुंबांना फायदा देण्यात येणार आहे. किफायतशीर दरात घर तयार करणे, खरेदी करणे आणि भाड्याने घेण्यासाठी मदत करणे यासाठी ही योजना मदत करेल. यासाठी अर्जदाराला ही कागदपत्रं द्यावी लागतील. तर अशी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

चार श्रेणीत मिळेल योजनेचा लाभ

केंद्राच्या PMAY २.० अंतर्गत २.३० लाख कोटी वाटप करण्यात येणार आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात १.१८ कोटी घरांना मंजूरी देण्यात आली होती. तर ८५.५ लाखांहून अधिक घरं अगोदरच पात्र लाभार्थ्यांना देण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात चार उत्पन्न घटकांतील पात्र लाभार्थ्यांना योजनेतंर्गत लाभ देण्यात येणार आहे.

- BLC : यातंर्गत सरकार ४५ चौरस मीटरपर्यंत घर तयार करण्यासाठी आर्थिक मदत देईल. केंद्र सरकार घर तयार करण्यासाठी २.२५ लाखांची आर्थिक मदत देण्यात येईल.
- AHP : यानुसार, खासगी, सरकारी स्तरावर नवीन हाऊसिंग योजनेतंर्गत घर तयार करण्यात येईल. आर्थिक दुर्बल घटकांना EWS घटकांना घर देण्यात येईल. यामध्ये केंद्र सरकार २.२५ लाख आणि राज्य सरकार ५० हजार मदत देईल. यासाठी वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपये हवे. तर LIG कुटुंबियांसाठी उत्पन्नाची अट ही तीन लाख ते सहा लाख रुपया दरम्यान आहे.
- ARH : यातंर्गत भाडेतत्वावर देण्यासाठी गृहप्रकल्प तयार करण्यात येतील. ज्यांच्याकडे घर तयार करण्यासाठी अथवा खरेदीसाठी पैसे नाहीत, त्यांच्यासाठी ही योजना आहे.
- ISS (interest Rate Subsidy) : यामध्ये घराची किंमत ३५ लाख रुपयांपर्यंत असेल तर २५ लाख रुपयांपर्यंत गृहकर्जाची विशेष सुविधा देण्यात येईल. १२० चौरस मीटर वा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे घर

खरेदी करणाऱ्यांना १.८० लाख रुपयांपर्यंत कर्ज सबसिडी देण्यात येईल. याचा लाभ EWS/LIG आणि MIG यांना मिळेल.

२. स्वच्छ भारत अभियान २.०

सर्व शहरांकरिता "कचरामुक्त" दर्जा प्राप्त करण्याचे ध्येय ठेवून स्वच्छ भारत अभियान नागरी २.० ची अंमलबजावणी साठी पुढील गोष्टींचा समावेश करण्यात आला.

- सर्व घरे आणि परिसरातील व्यक्ती यांनी त्यांच्या कचऱ्याचे "ओला कचरा" (स्वयंपाकघर आणि बागांमधील) आणि "सुका कचरा" (कागद, काच, प्लॅस्टिक आणि घरगुती घातक कचरा यांसह स्वतंत्रपणे वेष्टनात टाकलेला सानिटरी नापकीन कचर) असे वर्गीकरण करणे.
- प्रत्येक घरातून/ परिसरातून वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे १००% संकलन करणे.
- सर्व प्रकारच्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने १००% व्यवस्थापन आणि क्षेपणभूमीत शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करणे.
- कचरा डेपोंमध्ये वर्षानुवर्षे साचून राहिलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथे हरित पट्टे निर्माण करणे.
- शौचालयांतील मैल्याचे / वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन; सुरक्षित वाहतूक, शास्त्रोक्त प्रक्रिया करणे जेणे करून आसपासची जमीन, जलसाठे, भूजल इ. प्रदूषित होणार नाहीत हे ध्येय साध्य करण्याकरिता खालील प्रमाणे उद्देष्ट ठेवले आहे.

अ) शाश्वत घनकचरा व्यवस्थापन

- शहरातील घनकचऱ्यावर १००% वैज्ञानिक प्रक्रिया करून सर्व शहरे स्वच्छ आणि कचरामुक्त राहतील याची सुनिश्चिती करणे.
- घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेमधून निर्माण होणारे वायू प्रदूषण कमी करणे.
- एकदा वापरून टाकून देण्याच्या (एकल वापर) प्लॅस्टिकच्या वापरात टप्प्याटप्प्याने कपात करणे.

ब) वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया व शाश्वत व्यवस्थापन

- मैलायुक्त वापरलेल्या पाण्याची सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतच्या सर्व उपायांसह संपूर्ण शास्त्रोक्त प्रक्रिया करणे. (उत्सर्जन, प्रतिबंध, शुद्धीकरण, वाहतूक यांपासून ते शौचालयांमधील सर्व सांडपाण्याची सुरक्षित विल्हेवाट करणे पर्यंत).
- जलसाठ्यांमध्ये सोडण्यापूर्वी वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया१ आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करणे.
- गटारे व सेप्टिक टॅक्समध्ये प्रादुषके धोकादायकपणे मिसळण्याला प्रतिबंध करणे आणि गटारे व सेप्टिक टँक स्वच्छतेच्या कामांचे यांत्रिकीकरण करून मानवी हाताने मैला हाताळण्यावर कायमस्वरूपी बंदी घालणे.

क) प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून, 'जनआंदोलन' त रूपांतरण करण्याकरिता जनजागृती करणे, आणि 'स्वच्छ वर्तनासाठी संस्थात्मक बांधणी करणे.

ड) अभियानाची उिद्दष्टे साध्य करण्याकरिता पद्धतशीर उपाययोजना प्रभावीपणे अमलात आणण्याकरिता संस्थात्मक क्षमता निर्माण करणे.

३. माझी वसुंधरा अभियान

- पृथ्वी, वायु, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित "माझी वसुंधरा अभियान" राज्यामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्राम पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांची पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी स्पर्धा घेण्यात येते.
- निसर्गाच्या पंचतत्वावर आधारित पर्यावरणाचे संरक्षण वसंवर्धनकरणाऱ्या विविध शासकीय योजना / कार्यक्रम / उपाययोजना एकत्रित करूनत्या प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी इंडिकेटर स्वरूपात असलेली टुलकिट तयार करून स्थानिक स्वराज्य संस्थांना दिली जाते. ज्यामध्ये त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करण्यासाठी गुण ठेवण्यात येतात. या टूलकिट नुसार विविध उपाययोजना स्थानिक संस्थांमध्ये एप्रिल ते मार्च या एक वर्षाच्या कालावधीत राबवावयाच्या आहेत.
- माझी वसुंधरा अभियानात सहभागी सर्व स्थानिक संस्थांनी एप्रिल ते मार्च या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत केलेल्या कामाची माहिती एम.आय.एस.स्वरूपात माझी वसुंधरा अभियानाच्या वेबपोर्टलवर भरावयाची आहे. त्यानंतर, स्थानिक संस्थांनी भरलेल्या एम.आय.एस. चे डेस्कटॉप मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेमार्फत करण्यात येते.
- डेस्कटॉप मुल्यमापनात गुणानुक्रमे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांचे क्षेत्रीय मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेमार्फत संबंधित स्थानिक संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून करण्यात येते.
- डेस्कटॉप मुल्यमापन व क्षेत्रीय मुल्यमापन या मध्ये प्राप्त होणाऱ्या एकूण गुणांच्या आधारे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांची विजेते म्हणून निवड करून या स्थानिक संस्थांचा सन्मान जागतीक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून रोजी करण्यात येतो.

<u>माझी वसुंधरा अभियान १.०, २.०, ३.० व ४.० ची अंमलबजावणीः</u>

- माझी वसुंधरा अभियान १.० या अभियानाच्या पहिल्या वर्षात (२०२०-२१) राज्यामधील ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांनी (अमृत शहरे ४३, नगरपरिषदा २२२, नगरपंचायती १३०व ग्रामपंचायती २९१) सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान १.०मध्ये (१) अमृत. (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत असे ०४ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी १,५०० गुण ठेवण्यात आले होते. या अभियानाचा कालावधी २ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२१ असा होता. या अभियानात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान ऑनलाईन सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

- माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये माझी वसुंधरा १.० पेक्षा ५ पट जास्त म्हणजेच एकूण ११,९६८ (४०६ नागरी, ११,५६२ ग्राम पंचायती) एवढ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी नोंदणी करून सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४)ग्राम पंचायत ०१ व (५) ग्राम पंचायत ०२ असे ०५ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ६,००० तर अमृत गट वगळून इतर गटासाठी ५,५०० गुण ठेवण्यात आले होते. हे अभियान दिनांक १६ एप्रिल २०२१ पासून ३१ मार्च २०२२ या कालावधी मध्ये राबविण्यात आले होते. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२२ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

- माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये एकूण १६,८२४ (माझी वसुंधरा २.० पेक्षा ४,८५६ ने अधिक) (४११ नागरी, १६,४१३ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण ११ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्यसंस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृतगटासाठी ७,६०० तर, अमृत गट वगळून इतर गटासाठी ७,५०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ३.० चा कालावधी १एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत होता. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२३ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

- माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये एकूण २२,६३२ (माझी वसुंधरा ३.० पेक्षा ५८०८ ने अधिक) (४१४ नागरी, २२,२१८ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण १२ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ८,३००, अमृत गट वगळून इतर नागरी संस्थांसाठी ८,१०० तर, ग्राम पंचायतीसाठी ८,२०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ४.० चा कालावधी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ असा होता. परंतु, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे हा कालावधी दिनांक ३१ मे, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला होता.

- माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्थानिक संस्थांनी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध योजनांची मागील वर्षामधील प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे झालेली फलनिष्पती विचारात घेवून "माझी वसुंधरा अभियान ५.०" ची प्रारूप टूलकिट तयार करून ती सर्वसंबंधितांना पाठवून अभिप्राय मागविण्यात आले होते. यासंदर्भात प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेवून "माझी वसुंधरा अभियान ५.०" ची टूलकीट अंतीम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. <u>दिनदयाळ अंत्योदय योजना</u>

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. पीएमस्वनिधी-२०२०/प्र.क्र.७७/नवि-२० दिनांक १७ जून २०२०

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नगरवासियांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तू व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांना पथ विक्रेता, फेरीवाला, ठेलेवाला, रेहरीवाला, ठेलीफडवाला इत्यादी नावाने विविध भागांमध्ये ओळखले जाते. त्यांच्याद्वारे पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये उदाहरणार्थ भाज्या, फळे, तयार खाद्यपदार्थ, चहा, भजी, पाव आणि कापड, वस्त्र, चप्पल, कारागिरांद्वारे उत्पादित वस्तू, पुस्तके, स्टेशनरी इत्यादींचा समावेश होतो. तर सेवेमध्ये उदाहरणार्थ केशकर्तन दुकाने, चर्मकार, पान दुकाने, कपडे धुण्याची दुकाने इत्यादींचा समावेश होतो.

कोविड-१९ सर्वत्र पसरलेला असल्यामुळे आणि परिणामी टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम झाला आहे. बहुदा ते कमी भांडवलावर पथ विक्री करतात आणि जे काही भांडवल त्यांच्याकडे होते, तेही या टाळेबंदीमध्ये शिल्लक राहण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे पथ विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी खेळते भांडवलाचा पतपुरवठा तातडीनेप्रदान करण्याची आवश्यकता आहे, या वस्तुस्थितीचा विचार करुन शहरातील पथ विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा उभा

करण्यासाठी योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने शासनाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी- पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

योजनेची उद्दिष्टे :-

ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे संचलित असलेल्या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे-

- रुपये दहा हजार पर्यंतचे खेळते भांडवल कर्ज उपलब्धतेसाठी सुलभीकरण करणे.
- नियमित परतफेड करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे.

वरील उद्दिष्टांच्या आधारे पथ विक्रेत्यांना औपचारिकरित्या अर्थसहाय्य करण्यास ही योजना मदत करेल आणि या घटकाला त्यांची आर्थिक घडी बसविण्यासाठी नवीन संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

लाभार्थी पात्रता निकष :-

ही योजना दिनांक २४ मार्च २०२० रोजी व त्यापूर्वी शहरांमध्ये पथ विक्री करीत असलेल्या सर्व पात्र पथ विक्रेत्यांना लागू आहे. त्याबाबतचे निकष पुढीलप्रमाणे :-

- महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांनी प्रदान केलेले विक्री प्रमाणपत्र/ओळखपत्र असलेले पथ विक्रेते.
- महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांनी केलेल्या सर्वेक्षणात आढळलेले परंतु त्यांना विक्री प्रमाणपत्र/ ओळखपत्र दिले गेले नाही.

  महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांनी अशा विक्रेत्यांना आयटी आधारित प्लॅटफॉर्मद्वारे विक्रीचे तात्पुरते प्रमाणपत्र द्यावे व अशा विक्रेत्यांना एक महिन्याच्या कालावधीत त्वरित आणि सकारात्मकतेने कायमचे विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणात जे पथ विक्रेते वगळलेले आहेत किंवा ज्यांनी सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर विक्री सुरू केली आहेत आणि त्यास नागरी संस्थांनी किंवा नगर पथ विक्रेता समितीने शिफारसपत्र जारी केले आहे.
- आसपासच्या विकास /पेरी-शहरी/ ग्रामीण भागातील पथ विक्रेते नागरी क्षेत्रांमध्ये पथ विक्री करतात आणि त्याच नागरी संस्था किंवा नगर पथ विक्रेता समितीने शिफारसपत्र जारी केले आहे.

सर्वेक्षणातून वगळलेले किंवा आसपासच्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांची ओळख पटविणे :-

वरील तीन आणि चार संबंधित पथ विक्रेत्यांची ओळख पटविण्याकरिता महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती किंवा नगर पथ विक्रेता समिती शिफारस पत्र देण्यासाठी पुढीलप्रमाणे कोणत्याही कागदपत्रांचा आधार घेता येऊ शकेल.

- टाळेबंदीच्या कालावधीत एक वेळ मदत देण्यासाठी तयार केलेल्या पथ विक्रेत्यांची यादी.
- अर्जदाराची सर्व माहिती पडताळल्यानंतर कर्ज पुरविणाऱ्या संस्थेची व्यवस्था प्रणालीद्वारे महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती किंवा नगर पथ विक्रेता समितीकडे शिफारस पत्र मिळणेबाबत करण्यात आलेली शिफारस
- नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट वेंडर्स ऑफ इंडिया/ नॅशनल हॉकर्स फेडरेशन/ सेल्फ् एम्लॉईड वुमन असोसिएशन इत्यादी पथ विक्रेते संघटनेच्या सदस्यत्वाचा तपशील
- पथक विक्रेत्याच्या ताब्यात असलेली कागदपत्रे ज्याच्या आधारे त्याने विक्री करीत असल्याचा दावा केला आहे.

- महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती किंवा नगर पथ विक्रेता समितीने बचतगटांद्वारे किंवा वस्ती स्तर संघ इत्यादी द्वारे स्थानिक चौकशी करून तयार केलेला अहवाल.

- महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतीने अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये पडताळणी करून शिफारस पत्र बाबतची प्रक्रिया पूर्ण करण्याचे शासनाचे निर्देश आहेत.
- महानगरपालिका /नगरपरिषदा/ नगरपंचायती सर्व पात्र पथ विक्रेत्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीने अशा पथ विक्रेत्यांची ओळख पटविण्यासाठी इतर वैकल्पिक मार्ग अवलंबू शकतात.

- कोविड-१९ मुळे त्यांच्या मूळ गावी परत गेलेले पथ विक्रेते :-

शहरी भागामध्ये सर्वेक्षणामध्ये आढळलेले किंवा पथ विक्री करीत असलेले कोविड-१९ साथीच्या रोगामुळे त्यांच्या मूळ गावी आधी किंवा टाळेबंदी कालावधी दरम्यान गेलेले आहेत, असे पथ विक्रेते परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर परत येण्याची व त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्याची शक्यता आहे, असे पथ विक्रेते ग्रामीण/ पेरी-शहरी भागातील किंवा शहरी रहिवासी हे वर नमूद केलेल्या लाभार्थी पात्रता निकषांच्या आधारे कर्जासाठी पात्र असतील.

सार्वजनिक डोमेनमधील डेटा :-

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरून पात्र पथ विक्रेत्यांची यादी व माहिती शासनाने विकसित केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी व ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी, असे निर्देश शासनाने दिले आहेत.

लाभाचा तपशील :-

नागरी पथ विक्रेते एक वर्षाच्या परतफेड मुदतीसह १० हजार रुपये पर्यंतचे खेळते भांडवल कर्ज घेण्यास आणि त्याची दरमहा हप्त्याने परतफेड करण्यास पात्र असतील. या कर्जासाठी कर्जपुरवठा करणारी संस्था/ बँक कोणत्याही प्रकारचे तारण घेणार नाही.

विहीत कालावधीमध्ये किंवा तत्पूर्वी परतफेड करणारे पथ विक्रेते वाढीव मर्यादेसह पुढील खेळते भांडवलाच्या कर्जासाठी पात्र असतील. पथ विक्रेत्यांकडून ठरलेल्या तारखेपूर्वी कर्जाची परतफेड केल्यास कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेकडून कोणत्याही प्रकारचा दंड आकारला जाणार नाही.

व्याज दर :-

शेड्युल कमर्शियल बँक, रिजनल रुरल बँक, स्मॉल फायनान्स बँक, को-ऑपरेटिव्ह बँक आणि एसएचजी बँक यांचे व्याजदर त्यांच्या प्रचलित व्याजदराप्रमाणे असतील.

नॉन बँकिंग फायनान्स कंपनी, मायक्रो फायनान्स इन्स्टिट्यूट इत्यादींच्या बाबतीत व्याजदर हे संबंधित कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असतील.

या योजनेमध्ये एमएफआय आणि इतर कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था प्रवर्ग जे आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये येत नाहीत, त्यांच्यासाठी व्याजदर हे एनबीएफसी- एमएफआय साठी आरबीआयच्या विद्यमान मार्गदर्शक सूचनांनुसार लागू राहतील.

व्याज अनुदान :-

- या योजनेंतर्गत कर्जाचा लाभ घेणाऱ्या पथविक्रेत्यांनी विहीत कालावधीमध्ये कर्जाची परतफेड केल्यास ते ७ टक्के व्याज अनुदान मिळण्यास पात्र होतील.
- व्याज अनुदानाची रक्कम अर्जदाराच्या खात्यात तिमाही प्रमाणे जमा केली जाईल.

- प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर आणि ३१ मार्च रोजी संपणाऱ्या तिमाहीला कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था/ बँका व्याज अनुदानासाठी मागणी/ दावा सादर करतील.
- व्याज अनुदानाची रक्कम तिमाही कर्जदाराच्या खात्यात जमा केली जाईल.
- व्याज अनुदान दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत उपलब्ध आहे.
- व्याज अनुदान हे पहिले आणि त्यानंतरच्या वाढीव कर्जावर सदर तारखेपर्यंत उपलब्ध राहील.
- विहित मुदतीत, विहित वेळेपूर्वी कर्जाची परतफेड केल्यास स्वीकार्य व्याज अनुदानाची रक्कम एकाच वेळी जमा केली जाईल.

विक्रेत्याद्वारे डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन :-

या योजनेमध्ये डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल माध्यमातून व्यवहार करणाऱ्या विक्रेत्यांना कॅशबॅकची सुविधा देण्यात येत आहे. पथ विक्रेत्याने डिजिटल माध्यमातून केलेल्या व्यवहाराचा क्रेडिट स्कोर तयार होईल, ज्यामार्फत पथ विक्रेत्यांना त्यांच्या भविष्यातील गरजा भागविण्यासाठी पतपुरवठा निर्माण होईल. कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांचे जाळे आणि डिजिटल पेमेंट करणाऱ्या संस्था जसे की, एनपीसीआय (भिमसाठी), पे-टीएम, गुगल पे, भारत-पे, ॲमेझॉन-पे, फोन-पे इत्यादींचा पथ विक्रेत्यांना डिजिटल व्यवहाराकरिता ऑनबोर्ड करण्यासाठी वापर होईल. या ऑनबोर्ड पथ विक्रेता खालील निकषांनुसार प्रोत्साहनपर मासिक कॅशबॅक रुपये ५० ते १०० साठी पात्र ठरेल.

- एका महिन्यामध्ये प्रथम ५० पात्र डिजिटल व्यवहार केल्यास पथ विक्रेता पन्नास रुपये प्राप्त करेल.
- एका महिन्यामध्ये पुढील पन्नास पात्र डिजिटल व्यवहार केल्यास पंचवीस रुपये म्हणजेच १०० पात्र डिजिटल व्यवहार केल्यावर पथ विक्रेता ७५ रुपये प्राप्त करेल.
- पुढील अतिरिक्त शंभर किंवा त्यापेक्षा जास्त डिजिटल व्यवहार केल्यास पंचवीस रुपये म्हणजे २०० पात्र डिजिटल व्यवहार केल्यावर पथ विक्रेता शंभर रुपये प्राप्त करेल. वरील प्रमाणे मिळवण्यासाठी एका वेळेस कमीत कमी २५रुपयाचे डिजिटल व्यवहार करणे आवश्यक आहे.

कर्ज कोण देऊ शकते :-

अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, लघु वित्त बँका, सहकारी बँका, नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या, मायक्रो फायनान्स संस्था, आणि काही राज्ये/ केंद्रशासित प्रदेशात स्थापना झालेल्या बचतगट बँका उदाहरणार्थ स्त्रीनिधी इत्यादी कर्ज देणाऱ्या संस्था, त्यांचे क्षेत्रीय कार्यकारी जाळे जसे की, व्यवसाय प्रतिनिधी/ घटक/ एजंट इत्यादींचा वापर योजनेची जास्तीत जास्त व्याप्ती सुनिश्चित करण्यासाठी करतील.

पत हमी :-

मंजूर झालेल्या कर्जासाठी या योजनेत ग्रेडेड कव्हरची तरतूद आहे. हे कव्हर क्रेडिट गॅरंटी मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेस द्वारा प्रशासित आहेत.

नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३०८ चे कार्यवाहीबाबत माहिती

१. नियमबाहय/बेकायदेशीर ठरावाची अंमलबजावणी थांबविता येते
२. त्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ अस्तित्वात आहे
३. या अधिनियमातील ३०८(१) नुसार नगरपरिषदेच्या हितार्थ जिल्हाधिकारी आदेश निर्गमित करतात.
४. त्यानंतर कलम ३०८(२) नुसार अहवाल जिल्हाधिकारी प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन यांना सादर करतात.

५. संबंधित बाधित/हितसंबंधित नगरपरिषद कलम ३०८(३) अन्वये कलम ३०८(१) खालील आदेश मिळाल्यापासुन तीस दिवसांचे आत प्रतिवेदन सादर करु शकतात.

६. जिल्हाधिकारी यांचा अहवाल व नगरपरिषदेचेप्रतिवेदन(असल्यास) विचारात घेऊन कलम ३०८(४) खाली ओदश निर्गमित करण्याचे अधिकार प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांना आहेत.

७. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी कलम ३०८)४) अंतर्गत अंतिम आदेश निर्गमित केल्यावर सदर आदेश मुळ संचिकेसह जिल्हाधिकारी यांना पाठविणेत येतो. त्यामुळे बेकायदेशीर ठरावाची अंमलबजावणी टाळता येणे शक्य होते व नगरपालिकेचे हित जोपासले जाते